## NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक १८.०८.२०२६ मंगळवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १७.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०७ केसेसमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून एकुण ३,५५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०४ केसेसमध्ये ११ इसमांवर कारवाई करुन ९०,९१०/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,२६२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,२३,४५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक १७.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १८.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०३** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १८.०८.२०२६ चे ०१.०० वा. ते ०२.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे कोतवाली हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, तुळशीबाग रोड येथुन एक पांढऱ्या रंगाची बर्गमॅन मोपेडवरील इसम दसरा रोडकडे जाताना दिसला. त्याचे मोपेडला मागे नंबर नसल्याने त्याचेवर आलेल्या संशयावरून त्याचा पाठलाग करून त्यास दसरा रोड, मॅस्कार्ट होंडा सर्व्हीस सेंटर समोर थांबविले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव शेख शेहजान शेख समशेर, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ६७, मासुम कुँवा जवळ, भुतीया दरवाजा, दसरा रोड, महाल, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे उजव्या खिशात झिपलॉक पन्नीमध्ये एकुण २० ग्राम एम.डी. पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ ॲप्पल आयफोन व बर्गमन मोपेड क्र. एम.एच. ४९ बि.एक्स. ०७२६ असा एकुण ३,६०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद एमडी पावडर ही त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे शेख अर्शद उर्फ राजा मोहम्मद लतीफ शेख, वय ३० वर्षे, रा. प्लॉट नं. ८७, मॉ भवानी नगर, चामट लॉन समोर, खरबी, वाठोडा, नागपुर याची असुन, त्याने विक्रीकरीता बाळगुन असल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, दोन्ही आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कोतवाली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. एका आरोपीस अटक करण्यात

आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव कोतवाली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, सपोनि. आनंद बिचेवार, पोउपनि. नागेश पुन्नावाड, पोहवा विवेक अढाऊ, शेख इम्रान, ज्ञानेश्वर भोगे, गणेश जोगेकर, मपोहवा. अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड, धनपत मंझरेटे व राहुल पाटील यांनी केली.



**३) गुन्हेशाखा युनिट क्र. ५ पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १८.०८.२०२६ चे ००.५० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ५ चे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना पोलीस ठाणे कोराडी हद्दीत आर्यनगर, जगदंबा रेसीडन्सी चे पार्कींगमध्ये एका सुझुकी ॲक्सेस मोपेडजवळ एक इसम संशयीरित्या दिसल्याने, पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव फरहान आयुब शेख, वय २६ वर्षे, रा. फ्लॅट नं. १०१, पहीला माळा, जावळेचे घरी किरायाने, आर्य नगर, जगदंबा रेसीडन्सी, कोराडी, नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्याची व वाहनाची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातील सुझुकी ॲक्सेस मोपेड क्र. एम.एच. ४९ सि.क्यु. ८२७० चे डिक्कीमध्ये ०३ झिपलॉक पन्नीमध्ये एकुण १४ ग्राम १५ मि.ग्रॅ. एम.डी. पावडर व एक लहान वजनकाटा मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन व सुझुकी ॲक्सेस मोपेड, एमडी पावडर विक्रीतुन मिळालेले रोख ५,६७०/—रू आणि वजनकाटा असा एकुण २,५९,१७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद एम.डी. पावडर ही त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे शाहीद अन्सारी, रा. तकीया दिवानशहा, मोमीनपुरा, नागपुर याचेकडुन विक्रीकरीता आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगताना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कोराडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव कोराडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोउपनि. विशाल सांगोडे, पोहवा. नजीर शेख, राजु टाकळकर, राजुसिंग राठोड, राजेंद्र टाकळीकर, अनिस खान, प्रविण भगत, चंद्रशेखर गौतम, मुकेश राऊत, पोअं. विशाल नागभिडे, दिपक बावणकर व रोशन तांदुळकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे कोतवाली :— शस्त्र बाळगणारा आरोपी वाहनासह अटक.</u>**

दिनांक १८.०८.२०२६ चे ०४.१५ वा. चे सुमारास, कोतवाली पोलीसांचे पथक तसेच, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत सराईत गुन्हेगार तपासणी राबवित असतांना, त्यांना माहीती मिळाली की, अशोक चौक उड्डाणपुलाखाली, नागनदीचे कडेला एका दुचाकीजवळ ऑरेंज रंगाचा शर्ट घातलेला ईसम शस्त्रासह उभा आहे. अशा माहितीवरून नमुद ठिकाणी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळण्याचे तयारीत असतांना त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव सुजल दिलीप उईके, वय २२ वर्षे, रा. गल्ली नं. ०३, माया नगर, ललीत कला भवन जवळ, इंदोरा, जरीपटका, नागपूर असे सांगीतले. त्याचे जवळील यामाहा एफझेड दुचाकी क्र. एम.एच. २७, डि.पी. ३३२१ ला लागुन असलेली थैली ची पाहणी केली असता, त्यामध्ये एक लोखंडी कोयत्यासारखे शस्त्र मिळुन आले. आरोपीचे ताब्यातुन शस्त्र, मोबाईल फोन व दुचाकी वाहन असा एकुण किंमती ५१,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने लोखंडी शस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे दिलेल्या तक्रारीवरून पोउपनि. शिनगर यांनी पोलीस ठाणे कोतवाली येथे आरोपीविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २९.०७.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे पती नामे विक्रांत गोकुळ दुबे, वय ३१ वर्षे, रा. कुतुबशहा नगर, गिट्टीखदान, नागपुर हे त्यांचे बजाज दुचाकी क्र. एम.एच. ३१ ई.झेड. ६९६१ ने पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत, जुना काटोलनाका चौकाकडुन घरी जात असतांना, पोलीस मुख्यालय काटोल रोड येथे अपघात झाल्याने गंभीर जखमी झाले होते. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले होते. तेथुन त्यांना मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक ०४.०८.२०२६ चे ०४.३० वा. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले होते. याप्रकरणी अकस्मात मृत्युची नोंद घेण्यात आली होती. अकस्मात मृत्युचे चौकशीमध्ये ॲक्टीवा मोपेड गाडी क्र. एम.एच. ३१ एफ.के. ९००३ ची चालक जुही खान, वय ४५ वर्षे, रा. बळीरामजी टाऊन, न्यु कॉलोनी, सदर, नागपुर हीने तीचे ताब्यातील मोपेड भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहतुकीचे नियम न पाळता यु—टर्न घेतल्याने फिर्यादीचे पतीचे दुचाकीला धडकुन अपघात झाला. त्यामुळे ते गंभीर जखमी होवुन उपचारादरम्यान मरण पावले.

याप्रकरणी फिर्यादी श्रीमती राणी विक्रांत दुबे, वय ३० वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. सचिन खुटवळ ७२४९२२५८७३ यांनी मोपेड चालक महीला आरोपीविरूध्द कलम १०६(१),२८१,१२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३११०४५७ /२००३ | कलम ४५४, ४५७, ३८० भा.दं.वि. | १) सुनिल विठ्ठल इंगळे, रा. प्लॉट नं. ५६, राजगृह नगर, खोब्रागडे चे घरासमोर, एम.आय. डी.सी, नागपुर.<br>२) रवि मारोतराव लोणारे, रा. बिहारीचे घरी किरायाने, अमर नगर वस्ती, एमआयडीसी, नागपुर. | २०.०८.२०२६ |
| **२.** | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ६, नागपुर. | ३०८०३७२ /२००१ | कलम ४,२५ भा.ह.का.,सह कलम १३५ म.पो.का. | बबलु तुकाराम बोरकर, रा. आझाद नगर, नागोराव हालेचे घराजवळ, गिट्टीखदान, नागपुर | २०.०८.२०२६ |
| **३.** | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ०६, नागपुर. | ३११०४२९ /२००३ | कलम ४२०, ३४ भा.दं.वि. | १) गिरीजाशंकर बळीराम पाटील, रा. प्लॉट नं. १८, गंगा कॉम्प्लेक्स, जुना सुभेदार लेअ–आऊट, शारदा चौक, नागपुर.<br>२) राजाराम यशवंत पडाळकर, रा. काशीनाथ सहनिवास, पठाणपुरा रोड, वार्ड नं. ४, चंद्रपुर. ह.मु. – एसटी क्वॉर्टर क्र. १, बस स्टॉप जवळ, गणेशपेठ, नागपुर.<br>३) चंद्रशेखर आनंदराव निनावे, रा. प्लॉट नं. ४३, रूक्मीणी नगर, खातरोड, भंडारा. ह.मु.– एसटी क्वॉर्टर, मोक्षधाम, गणेशपेठ.<br>४) मुक्तामणी ग्यानचंद्र गोयल, रा. प्लॉट नं. ४०, पुर्व वर्धमान नगर, वैष्णौदेवी चौक, लकडगंज, नागपुर. | १९.०८.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ५) अमरजितसिंग लुधाना उर्फ पगताना महेंद्रसिंग उर्फ मोहींदरसिंग लुधाना पगताना, रा. प्लॉट नं. २, मानव नगर, नारीरोड, जरीपटका, नागपुर. | |
| ४. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. १२, नागपुर. | ३२६६/ २०१३ | कलम २९४ भा.दं.वि. | प्रविण रामभाऊ पटले, रा. प्लॉट नं. ३५०, राममंदीर समोर, चंदन नगर, गायकवाडचे घरी किरायाने, नागपुर | २४.०८.२०२६ |
| ५. | मा. तदर्थ जिल्हा न्यायाधिश–१, तथा अती सत्र न्यायाधीश, नागपुर. | ४६/२०१३ | कलम २०, २९ एन.डी. पी.एस. ॲक्ट | मोहम्मद जुबेर मोहम्मद ाकील, रा. भालदारपुरा, शब्बानी क्लब मागे, सेवासदन चौक, गांधीबाग, नागपुर. | २०.०८.२०२६ |
| ६. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०७०४९६ /१९९५ | कलम ३२६, ३४ भा.दं.वि. | बंडु महादेवराव निनावे, वय २२ वर्षे, रा. नाईकतलाव, बांग्लादेश चौकीमागे, पाचपावली, नागपुर | २०.०८.२०२६ |
| ७. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ११, नागपुर. | ३०२६८६/ २००८ | कलम २९४ भा.दं.वि. | शिवा हलकीप्रसाद समशेरीया, रा. बारासिग्नल, बोरकर नगर नाल्याजवळ, ईमामवाडा, नागपुर | २२.०९.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**